श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा

।। समओवी ।।



• भावार्थ समओवी, भावगीता, चिंतन व संपादन •

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा

।। समओवी ।।

* * *

● भावार्थ समओवी, भावगीता, चिंतन व संपादन ●

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : ऑक्टोबर २०१२
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

* श्री ज्ञानेश्वरीतील एक हृद्य प्रार्थना *

(येथे नित्य वाचन, मनन, चिंतन यांसाठी घेतली जाणारी प्रार्थना)

आम्हां काय उचित । तें पाहतां न स्फुरे येथ । जे मोहें येणें चित्त । व्याकुळ माझें ॥२.५५॥
तिमिराविरुद्ध जैसें । दृष्टीचें तेज भ्रंशे । मग पांसींच असतां न दिसे । वस्तुजात ॥२.५६॥
देवा मज तैसें जाहलें । जें मन हें भ्रांती ग्रासिलें । आतां काय हित आपुलें । तेंही नेणें ॥२.५७॥
तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें । निकें तें आम्हां सांगावें । जे सखा सर्वस्व आघवें । आम्हांसि तूं॥२.५८॥
तूं गुरु बंधु पिता । तू आमुची इष्ट देवता । तूंचि सदा रक्षिता । आपदीं आमुतें ॥२.५९॥
जैसा शिष्यांतें गुरु । सर्वथा नेणे अव्हेरु । की सरितांतें सागरु । त्यजी केवीं ॥२.६०॥
ना तरी अपत्यातें माये । सांडूनि जरी जाये । तरी तें कैसेंनि जिये । ऐकें कृष्णा ॥२.६१॥
तैसा सर्वांपरि आम्हांसी । देवा तूंचि एक आहासि । आणि बोलिलें जरी न मानिसी । मागील माझें ॥२.६२॥
तरी उचित काय आम्हां । जे व्यभिचरेना धर्मा । तें झडकरी पुरुषोत्तमा । सांगें आतां ॥२.६३॥

* श्री ज्ञानेश्वरांची आरती *

जय देव जय देव श्री ज्ञानेश्वर ।
योग्यांची माउली, भक्तांची सावली, देव साकार ।। जय देव जय देव ।।धृ।।

भक्तीचा कैलास, ज्ञानसागर । ज्ञानेश्वर माझा प्रेमपाखर ।
ज्याला त्याला वाटे अपुला आधार । नाही झाली असली माउली थोर ।।१।।

जाणत असुनी गीता वेदार्थ सगळा । वंचित जीवांसाठी जीव कळवळला ।
ज्ञान सोपे करुनी अनुभवही दिधला । पसायदाने जीव शांत हा केला ।।२।।

धाक वेदज्ञांना, पाखंडी जना । अव्यक्ताची सत्ता दावी सर्वांना ।
देवमार्गी कोणी मोठा ना साना । दिंडीने विठ्ठल भेटे सर्वांना ।।३।।

साहुनी दु:ख, बोल अज्ञ जीवांचे । हरिपाठे कल्याण केले सर्वांचे ।
ज्ञानेश्वरी अमृत अपुल्या भाषेचे । भाग्य दीना कळु दे काय हे अमुचे ।।४।।

'भक्तिमार्गाचा मंत्र दिला । सोपा आचरण्याला ।।'

१. भक्तियोगाची गरज : एखादी गोष्ट सहज, फुकट मिळाली, खूप टिकली आणि त्यातही ती फार उत्तम असली तर तिची किंमत कळत नाही, महत्त्व वाटत नाही. ती आपण गृहीत धरतो, फक्त वापरतो. तसं मनुष्याच्या देहाचं नि आयुष्याचं झालं आहे. पापणी आपोआप लवते आहे, दृष्टीचं संरक्षण करते आहे, अन्न आपोआप पचतं आहे, त्यावर शरीर आपोआप चालतं आहे, वाढतं आहे, पुष्टी देणारे घटक शोधून सर्वत्र पुरवले जात आहेत, निरुपयोगी निवडून फेकले जातात-विसर्जित होतात, श्वास आपोआप चालतो, हृदय आपलं काम आपोआप करतं आहे - अशा इतक्या गोष्टी सहज, फुकट नि उत्तम मिळताहेत की त्या कशासाठी नि देणारी यंत्रणा कोण असे साधे प्रश्नसुद्धा अनेकांच्या आयुष्यात कधी पडत नाहीत. कित्येकदा शेवटपर्यंतही ! यापेक्षा या मनुष्ययोनीची शोकांतिका कुठली असेल ? हे प्रश्नच न पडल्यानं तोंड-जीभ आवडीचं भक्ष्य-अभक्ष्य मागेल ते खाण्यासाठी, पेय-अपेय पिण्यासाठी, डोळे, कान, त्वचा - हे मनाला सुखाचं वाटतं ते करण्यासाठीच आहेत, हे देहबुद्धीचं उत्तरही 'आपोआप' सुचलं तर नवल नाही ! तेच बहुतांश जगात चालतं. म्हणून मनुष्याचं जीवन भले कितीही भौतिक प्रगतीचं आणि समृद्धीचं होतं आहे असं वाटो, ते भोगवाद, चंगळ, भ्रम, क्षोभ, अस्वास्थ्य, नैराश्य अखेर हतबलता यांच्याकडं चाललं आहे, हे सामान्यांनाही दिसतं.

म्हणून या देह आणि मनुष्यजीवनाच्या अनमोल रत्नाची जाणीव, ओळख, खरा उपयोग आणि स्वास्थ्य-समाधान यांची प्राप्ती करून देणाऱ्या 'भक्तियोगा'ची गरज आता आणखीच वाढली आहे. त्याचा प्रस्ताव नवव्या अध्यायात झालाच आहे. पण त्याचं प्रात्यक्षिक आणि जे गरजेचे असतात ते आचरणाचे मुद्दे - या बाराव्या अध्यायात अत्यंत सोपेपणानं आले आहेत. म्हणून यात मांडलेल्या भक्तियोगाची गरज निःसंशयपणे आपल्याला आहे - खऱ्या अर्थानं जीवन स्वास्थ्याचं करण्यासाठी - स्वतःचं आणि त्या प्रमाणात समाजाचंही !

२. भक्तियोग हा एकच नव्हे, जरा अधिक सोपा मार्ग : स्वास्थ्य किंवा शाश्वत समाधानाच्या गावी जायला अनेक मार्ग आहेत. डोंगरावरच्या देवळात पोचायला वाटा आणि वेग - दोन्ही बाबतीत खूप पर्याय असू शकतात. तसा काट्याकुट्यांचा, बिनसोबतीचा-धोक्याचा योगमार्गही आहे, भ्रमाची दलदल आणि अहंकाराचं आपटून हातपाय मोडणारं शेवाळं जागोजागी वाढलेला ज्ञानमार्गही आहे, असंख्य संतसाधूंनी परिश्रमानं डांबरीकरण करून बांधून काढलेला घाटाचा, चढ जाणवू नये म्हणून डोंगराला प्रदक्षिणा घालीत वर नेऊन, अंतर न जाणवता चढ संपवून, माथा गाठणारा, अनेक भक्त-वारकऱ्यांची सोबत असलेला भक्तिमार्गही आहे - असे अजूनही मार्ग आहेत. सारे तिथंच नेतील आणि हेही की अविचारी किंवा अधिक बरोबर म्हणायचं तर विचारशून्य अशा पायथ्याच्या सध्याच्या भोग-क्षोभ-भय असल्या गावापासून तरी नक्कीच वर नेणारे आहेत, एवढं मात्र खरं. तीच गोष्ट वेगाचीही आहे. क्षमता, प्रयत्न, त्यामागची तळमळ, सातत्य आणि कृपा यानुसार माणूस डोंगरावर पोचेल. पक्षी उड्डाण करतो, वेग जास्त म्हणून तो लवकर पोचेल आणि मुंगी पायी, सावकाश जाणारी म्हणून उशीरा पोचेल - हे वरवर व्यवहारात खरं वाटलं तरी - रेंगाळणं, वाटेतले धोके, अडचणी यांनी पोचण्याचं गणित उलटसुलट होऊ शकतं, होतंही. म्हणून शेकडो वर्षं योगसाधन करून पुन्हा नक्की काय करावं हा प्रश्न राहतो आणि विशीतला श्री माउलींसारखा महात्मा भक्तियोगाच्या शिखरावर इतिकर्तव्याचा वारा निवांतपणे घेत योग्यांनाच काय या अखिल जगाला निरंतर टिकणारे अमृतबोल बोलतो.

म्हणून सुरुवातीलाच अर्जुनाला वाटतो तो प्रश्न अनेकांना पडतो - योगाच्या शॉर्टकट-जवळच्या मार्गानं, जाणं योग्य की हा भक्तीचा दीर्घ वाटणारा मार्ग चालून जाणं योग्य - आणि यातल्या कुणाबद्दल देवाला अधिक प्रेम वाटेल, कोण त्याचा अधिक आवडता असेल ? म्हणून लक्षात घ्यावं की, उत्तम योगाधिकारसंपन्न श्री माउली निखालस सांगतात की, योगी चांगला. मला आवडतोच, पण भक्ती अधिक चांगली. भक्त अधिक आवडतो. कारण वाट लांबची असली तरी निर्धोक आहे. जाताजाता स्वतःचं आणि इतरांचं कल्याण साधून जाणारी आहे. (ओव्या ८०/८३/९३ इ.)

(सहा)

३. आज्ञेनं सांगण्याचं महत्त्व : साध्या प्रपंचात एखादी गोष्ट कळली, माहीत झाली की, सांगावीशी वाटते. तिनं भलं होतंच असं नाही. अन् अकारण सांगण्यानं नाराजी, समज-गैरसमज, इतरांचं स्वास्थ्य घालवायला आपण कारण होणं, शब्दशक्ती वाया जाणं, सांगण्याची हौस-प्रौढी वाढणं, आयुष्याचा मोलाचा वेळ वाया जाऊन अकारण अहंभाव वाढून अखेरीस स्वतःचंच नुकसान होणं - असे अनेक दोष पदरी येतात. हे सारं स्थूल, दृश्य व्यवहारात होतं, तर परमार्थात काय होत असेल ? त्या नुकसानीची आपण कल्पना करावी. याला सोपा उपाय म्हणजे सांगण्याला गुरूंच्या आज्ञेचा लगाम घालणं. ज्यांच्या अंगी अपार थोरवी आहे, ते श्री माउली अध्यायाच्या सुरुवातीला श्री गुरू निवृत्तिनाथांना 'मला निरूपणाची आज्ञा द्यावी' अशी विनंती का करतात ही बाब साधी असली तरी खरे भक्त होऊ इच्छिणाऱ्यांना अत्यंत मोलाची आणि आचरणीय आहे. (ओवी/१०)

४. गुरूंबद्दलचा भाव : खरं तर परमार्थातल्या गुरूंचं खरं कार्य कळत नाही, गरज लक्षात येत नाही आणि म्हणून तळमळीचा आदरभाव येत नाही. तो यायला स्वतःचा, जगाचा अनुभव पुरेसा आहे. पण कुणी जागा असेल तर ना? रोज आयुष्याचा एक दिवस कमी होतो. मृत्यू आणखी जवळ येतो. शरीरातली एखादी साधी वाटणारी यंत्रणा काम करीत नाहीशी होते नि माणसाचं तथाकथित कर्तृत्व लटकं पडतं. प्रयत्नांच्या प्रमाणात यश-अपयश आढळत नाहीत. जवळचं माणूस अकल्पितपणे दुरावतं. नियोजित गावी, घरी, परिसरात प्रयत्न करूनही राहाता येत नाही. बघता बघता गावं, घरं, कुटुंबं, संस्था उद्ध्वस्त होतात. वर्षानुवर्षं श्रेष्ठ, अनुकरणीय वाटलेली मतं-विचारप्रणाली काळाच्या एका वावटळीत निकामी ठरतात. आपल्या स्वतःच्या कल्पना, मतं, आग्रह, धारणा - स्वतःलाच पटणार नाही इतक्या - बदलतात. इतक्या अगणित अनुभवांनीसुद्धा आपल्याला जीवन कळल्याचं, आपण बरोबर असल्याचं वाटतं. कुणा समग्र जीवन जाणणाऱ्या गुरूंकडं,

ग्रंथाकडं, निसर्गाकडं जावं, समजून घ्यावं असं वाटत नाही - यासारखा भ्रम नसेल. पण त्यापोटी नुकसान स्वतःच्या अख्ख्या जन्माचं होतं, हे काय सांगायला हवं ?

म्हणून श्री माउर्लीसारख्यांना आपण ज्ञानी निवृत्तिनाथांना गुरू करावं, जगण्याची दृष्टी-पातळी मिळवावी, तिचं आचरण करावं, मग त्यांच्या अपार उपकारांचं मनःपूर्वक सतत स्मरण करावं - असं का वाटलं ते कळून येईल. मग भक्तिमार्गाचं दार खुलं होईल. वीस श्लोकांच्या गीतेवरच्या निरूपणाच्या सुरुवातीलाच सुवर्णालंकारासारख्या एकोणीस ओव्या श्री माउली आपुल्या श्री गुरूंचं कृतज्ञ स्मरण करण्यासाठी का देत असतील, याचं औचित्य अधिक स्पष्ट होईल. (ओव्या १ ते १९)

५. भक्तियोगाचं वैशिष्ट्य : भक्तीनं भगवंताशी म्हणजे समाधानाशी जोडलं जाण्याचं फार मोठं वैशिष्ट्य कशात आहे, हे समजून घेण्यासारखं आहे. बाराव्या अध्यायात भक्तांची अगदी सुस्पष्ट अशी ३९ लक्षणं दिली आहेत. ती श्री माउलींनी अनेक दृष्टांतांनी सोपी केली आहेतच. त्यामुळं ती कुणालाही समजून घेता येतील. एक वेळ योगासाठी, ज्ञानासाठी शरीर-बुद्धी यांची कुवत लागेल, पण इथं तेही काम सोपं आणि निश्चित करून दिलं आहे. ते कुणालाही स्वतःला कळून घेण्यासारखं आहे. त्यात दिलेल्या गुणांना जाणीवपूर्वक आत्मसात करायचं ठरवलं, तर प्रयोगानं ते करणं स्वाधीनच आहे.

त्याचं सर्वांत मोठं वैशिष्ट्य हे की, ज्या देहाच्या तंदुरुस्तीची, बुद्धिमत्तेची गरज इतर मार्गांत आवश्यक आहे, त्याची गरज इथं त्यामानानं नगण्य आहे. शिवाय धोके कमी आहेत. समजून घ्यावं आणि आचरावं. श्री माउलींसारख्यांचं- कुणा संतांचं मार्गदर्शन घ्यावं. या भक्तियोगासाठी घर सोडायला नको, प्रपंच सोडायला नको, शरीराच्या गरजा-निसर्गचक्र तोडायला नको. त्यात माणसाला वात्सल्य-प्रेम-करुणा-न्याय-त्याग असे गुण उपजत असतातच. फक्त त्यांचं शुद्धीकरण होतं आहे ना, ते

भक्तिमार्गाच्या कामी लागतात ना, हे पाहात रहाणं, हेच इथं काम आहे. आपल्या प्रगतीच्या खुणासुद्धा आपल्या घरी, व्यवसायात, कामकाजाच्या ठिकाणी - स्वास्थ्य, शांतीच्या रूपानं मिळतील, अशी सोय आहे. अशा या साऱ्या गुणांच्या अभ्यासाला निरपेक्षतेची, स्थैर्याची, सातत्याची जोड ठेवली की झालं.

मग एवढ्या सोप्या मार्गानं 'समाधानाची कस्तुरी' लाभते कशी ? त्याच्या उत्तरातच या गुणांचं आणि भक्तियोगाचं वैशिष्ट्य आहे. आपण हे सारे गुण बारकाईनं पाहावे. ते सारे मुळातच मन, बुद्धी, चित्त यांच्या शुद्धीशी निगडित आहेत. योग, ज्ञान वा इतर मार्गांना लागणाऱ्या शरीर, बाह्य अनुकूलता यांच्याशी त्यांचा संबंध कमी आहे. एखाद्या दुर्गम, भक्कम, अभेद्य कुलुपबंद भुईकोट किल्ल्याच्या थेट कुलुपाचीच किल्ली हाती यावी आणि ती लावून अलगद आत शिरावं तसं हे आहे. ज्ञान म्हणजे तटबंदीतल्या दगडांत पाय खोवून, बुरुज चढून आत उडी मारण्यासारखं धोक्याचं आहे. योग म्हणजे दरवाजावर, तटबंदीवर वर्षानुवर्षं अवजड हातोड्यानं प्रहार करून ती फोडून आत प्रवेश मिळवण्यासारखं कष्टमय आहे. भक्तिमार्ग सोपा का, तर तो दार उघडून थेट आत जाणारा आहे आणि सर्वांना प्रवेश देणारा आहे.

याचा लाभ आपण घेणं आपल्या सर्वांच्याच हाती आहे. आपण तो लाभ कधी घेतो, याची वाट पाहाणारा परमात्मा (ओवी २३४) असे प्रयत्न करणाऱ्यांवर नक्की कृपा करील, याची खात्री वाटते. तो अशा जागृत व प्रयत्नशील भक्तांना यश देवो, अशी श्री माउलींच्या चरणी आर्त प्रार्थना !

टीप : नवव्या अध्यायाची समओवी करताना तिची भूमिका, मर्यादा, उपयोग, आधारप्रत, पाठभेद इ. विषयी त्या ठिकाणी सविस्तर लिहिलं आहे. आवश्यक वाटल्यास संदर्भासाठी ते पाहावं, ही विनंती. त्या अध्यायाप्रमाणंच ही समओवी श्रींच्या आज्ञेनं व कृपेनं आकाराला येत आहे, हे कृतज्ञतेनं नमूद करतो.

रचनाक्रम - पुस्तक स्वरूपातील आवृत्तीत मूळ ज्ञानेश्वरीचे पारायण किंवा समओवीचे वाचन सलगपणे करण्याच्या सोयीसाठी वरील पानावर ज्ञानेश्वरी ओव्या व खालील पानावर समओव्या अशी रचना करण्यात आली होती. तरी सदरच्या पीडीएफ स्वरूपातील या आवृत्तीत समसंख्या असलेल्या पानावर मूळ ज्ञानेश्वरी आणि विषम संख्या असलेल्या पानावर समओवी कृपया पाहावी, ही विनंती.

(नऊ)

जयजय शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतिये ।।१।।

विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी ताठी । ते तुझिये गुरुकृपादृष्टी । निर्विष होय ।।२।।

तरि कवणातें तापु पोळी । कैसेनि वो शोकु जाळी । जरि प्रसादरसकल्लोळीं । पूरें येसि तूं ।।३।।

योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळे । सोहंसिद्धीचे लळे । पाळिसी तूं ।।४।।

आधारशक्तीचां अंकीं । वाढविसी कौतुकीं । हृदयाकाशपल्लकीं । परिये देसी निजे ।।५।।

प्रत्यक्ज्योतिची वोवाळणी । करिसी मनपवनांचीं खेळणीं । आत्मसुखाचीं बाळलेणीं । लेववसी ।।६।।

सतराविये्चें स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरु गासी । समाधिबोधें निजविसी । बुझाऊनि।।७।।

म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझां पाउलीं । या कारणें मी साउली । न संडीं तुझी ।।८।।

अवो सद्गुरुचिये कृपादृष्टी । तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी । तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ।।९।।

म्हणोनि अंबे श्रीमंतें । निजजनकल्पलते । आज्ञापीं मातें । ग्रंथनिरूपणीं ।।१०।।

नवरसां भरवीं सागरु । करवीं उचित रत्नांचे आगरु । भावार्थाचे गिरिवरु । निफजवीं माये।।११।।

जय गुरुकृपावृष्टी शुद्ध । जी उदार म्हणून प्रसिद्ध । जी वर्षत आनंद । अखंडपणे ।।१।।

विषयसर्पाने करिता दंश । उतरेना ज्यांचे विष । ते या पडता दृष्टीस । निर्विष होत ।।२।।

प्रसन्नतेचा तुला पूर । जरी येईल अनावर । कसा खेद जाळू शकणार । ताप कुणा होई ? ।।३।।

योगसुखाचे सोहळे । प्राप्त होती तुझ्यामुळे । सोहंसिद्धीचे लळे । पुरविसी असे ।।४।।

आधारचक्राच्या मांडीवरी । भक्तांना वाढविसी परोपरी। हृदयाकाशाच्या पाळण्यावरी । झोके देशी ।।५।।

आत्मज्योतीने ओवाळिसी । मनप्राणांची खेळणी देशी । बाळलेणी घालिशी । आत्मानंदाची ।।६।।

जीवनकलेचे दूध देशी । अनाहताचे गाणे गाशी । समाधीच्या बोधाने निजविशी । शांत करुनी ।।७।।

म्हणुनी साधकांची तू माउली । साहित्य पिके तुझ्या पाउली । मी न सोडी साउली । यासाठी तुझी ।।८।।

अशी गुरुकृपावृष्टी स्वीकारी । अहो ज्याला अंगिकारी । त्याला निर्माता करी । सर्व विद्यांचा ।।९।।

हे कृपावृष्टिरूप माते । आम्हा भक्तांच्या कल्पलते । आज्ञा देई मज श्रीमंते । ग्रंथनिरूपणाची ।।१०।।

नवरस माझ्या भाषेत । तशी अलंकाररत्ने उचित । भावार्थांचे श्रेष्ठ पर्वत । येतील असे करी ।।११।।

साहित्यसोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया आक्षोणी । विवेकवेलीची लावणी । हों देई सैंघ ।।१२।।

संवादफळनिधानें । प्रमेयाचीं उद्यानें । लावीं म्हणें गहनें । निरंतर ।।१३।।

पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वादअव्हांटे । कुतर्काचीं दुष्टें । सावजें फेडीं ।।१४।।

श्रीकृष्णगुणीं मातें । सर्वत्र करीं वो सरतें । राणिवे बैसवी श्रोते । श्रवणाचिये ।।१५।।

मऱ्हाटियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं । घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ।।१६।।

तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांघुरविशील सदैवें । तरि आतांचि हें आघवें । निर्मीन माये ।।१७।।

इये विनवणीयेसाठीं । अवलोकिलें गुरू कृपादृष्टी । म्हणें गीतार्थेंसीं उठी । न बोलें बहु ।।१८।।

तेथ जी जी महाप्रसादु । म्हणोनि साविया जाला स्वानंदु । आतां निरोपीन प्रबंधु । अवधान दीजे ।।१९।।

अर्जुन उवाच : एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।

ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ।।१।।

तरी सकळवीराधिराजु । जो सोमवंशीं विजयध्वजु । बोलता जाहला आत्मजु । पांडुनृपाचा ।।२०।।

खाणी मराठीच्या भूमीत । साहित्यसोन्याच्या उघडोत । विवेकवेलीची लावणी घडोत । सगळीकडे ।।१२।।

बागा सिद्धान्तांच्या । तशा गहन प्रमेयांच्या । फुलोत संवादफळांच्या । निरंतर ।।१३।।

नको दरी नास्तिकतेची । आडवाट वितंडवादाची । दुष्ट जनावरे कुतर्काची । हाकलून द्यावी ।।१४।।

श्रीकृष्णगुण वर्णिता । करी समर्थ मज आता । श्रवणराज्यावरी अवघा श्रोता । राज्य करो ।।१५।।

मराठीच्या या नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी । घेणेदेणे आनंदाचे करी । सर्व जगाला ।।१६।।

श्रीगुरुमाय प्रेमळपणाचे । पांघरूण जरी घाली नित्याचे । कार्य अवघे निरूपणाचे । जमेल मज ।।१७।।

या विनंतीपोटी । गुरूंनी टाकिली कृपादृष्टी । म्हणती इतर न करी गोष्टी । गीतार्थ सांग ।।१८।।

या शब्दांचा मिळता प्रसाद । झाला एकाएकी आनंद । आता सांगेन प्रबंध । तरी लक्ष द्यावे ।।१९।।

अर्जुन म्हणती भक्त, सगुणा नित्य उपासिती ।

निर्गुणाचेहि जे भक्त, श्रेष्ठ कोण तयातिल ।।भावगीता १२.१।।

जो राजा सर्व वीरांचा । विजयध्वज सोमवंशाचा । पुत्र जो पंडुराजाचा । तो बोलता झाला ।।२०।।

कृष्णातें म्हणे अवधारिलें । आपण विश्वरूप मज दाविलें । तंव नवल म्हणोनि बिहालें । चित्त माझें ।।२१।।

आणि ये कृष्णमूर्तीची सवे । यालागीं सोय धरिली जीवें । तंव नको म्हणोनि देवें । वारिलें मातें ।।२२।।

तरि व्यक्त आणि अव्यक्त । हें तूंचि एक निभ्रांत । भक्ती पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें ।।२३।।

या दोनी जी वाटा । तूतें पावावया वैकुंठा । व्यक्ताव्यक्त दारवंठां । रिगिजे येथ ।।२४।।

पैं जे वानी श्यातुका । तेचि वेगळिया वाला येका । म्हणोनि एकदेशीया व्यापका । सरिसा पाडू ।।२५।।

अमृताचां सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी । तेचि दे अमृतलहरी । चुळीं घेतलिया ।।२६।।

हे कीर माझां चित्तीं । प्रतीति आथि जी निरुती । परि पुसणें योगपती । तें याचिलागीं ।।२७।।

जें देवां तुम्हीं नावेक । अंगिकारिलें व्यापक । तें साचचि कीं कवतिक । हें जाणावया ।।२८।।

तरि तुजलागीं कर्म । तूंचि जयांचें परम । भक्तीसी मनोधर्म । विकोनि घातला ।।२९।।

इत्यादि सर्वां परी । जे भक्त तूंतें हरी । बांधोनियां जिव्हारीं । उपासिती ।।३०।।

आणि जें प्रणवापैलीकडे । वैखरीयेसि जें कानडें । कायिसयाहि सांगडें । नव्हे जें वस्तु ।।३१।।

श्रीकृष्णास म्हणे अर्जुन । विश्वरूप दाखविले आपण । परि अपूर्व ते म्हणून । भयभीत झालो ।।२१।।
सगुण रूपाची सवय । म्हणुनी करिता आश्रय । सगुण न बरा उपाय । म्हणुनी नाकारिले ।।२२।।
व्यक्त असो वा अव्यक्त । तूचि असशी निश्चित। भक्तीने पावे व्यक्त । योगाने अव्यक्त ।।२३।।
या दोन्ही वाटा असती । त्या तुझ्या दारी येती । परी उंबऱ्यावरी सोडिती । तुझ्या देवा ।।२४।।
सोन्याच्या मोठ्या लगडीला कस । तोचि त्याच्या गुंजभरास । योग्यता जी व्यापकास । थोड्यासही तीच।।२५।।
अमृताच्या सागरी थोरवी । लाटेतही तीच यावी । निर्गुण, व्यापकाची दिसावी । योग्यता सगुणीही ।।२६।।
हा माझा खरा भाव । आहे प्रत्यक्ष अनुभव । परी प्रश्नाला वाव । त्यानेच आहे ।।२७।।
कारण देवा जे निर्गुण । स्वरूपे दाविले व्यापकपण । प्रशंसिलेही ते जाण । हे खरे की कौतुक ।।२८।।
मग तू ज्यांचे परमधाम । तुझ्यासाठी करिती कर्म । भक्तीसाठी सर्व मनोधर्म । विकिले ज्यांनी ।।२९।।
असे सर्व प्रकार साधिती । तुझी भक्ती करिती । अंतःकरणापासून उपासिती । तुला कृष्णा ।।३०।।
आणि प्रणवापलीकडे । वाणीलाही दुर्बोध पडे । उपमेसही न सापडे । काही वस्तु ।।३१।।

तें अक्षर जी अव्यक्त । निर्देश देशरहित । सोहंभावें उपासित । ज्ञानिये जें ।।३२।।

तयां आणि जी भक्तां । येरयेरांमाजीं अनंता । कवणें योगु तत्त्वता । जाणितला सांगा ।।३३।।

इया किरीटीचिया बोला । तो जगद्बंधु संतोषला । म्हणे हो प्रश्नु भला । जाणसी करूं ।।३४।।

श्रीभगवानुवाच : मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।

श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ।।२।।

तरि अस्तुगिरीचां उपकंठीं । रिगालिया रविबिंबापाठीं । रश्मी जैसे किरीटी । संचरती ।।३५।।

वर्षाकाळीं सरिता । जैसी चढों लागें पांडुसुता । तैसी नीच नवी भजतां । श्रद्धा दिसे ।।३६।।

परि ठाकिलियाहि सागरु । जैसा मागीलही यावा अनिवारु । तिये गंगेचिये ऐसा पडिभरु । प्रेमभावा।।३७।।

तैसें सर्वेंद्रियांसहित । मजमाजीं सूनि चित्त । जे रातिदिवो न म्हणत । उपासिती ।।३८।।

यापरी जे भक्त । आपणपें मज देत । तेचि मी योगयुक्त । परम मानीं ।।३९।।

ते जे अक्षर, अव्यक्त । निर्देश, देशरहित । सोऽहंभावे उपासित । ज्ञानी ज्याला ।।३२।।

अशा या ज्ञानी भक्तांनी । तसे या सगुणभक्तांनी । जाणिले खरे कोणी । तुला सांग ।।३३।।

अर्जुनाचा ऐकून प्रश्न । संतुष्ट झाले श्रीकृष्ण । म्हणती चांगले प्रश्न । करण्या जमती तुला ।।३४।।

भगवान म्हणती युक्त, मन सगुणात ठेवुनी ।

श्रद्धेने कर्म आचरती, श्रेष्ठ जे मज वाटती ।।भावगीता १२.२।।

सूर्य जाता पश्चिमेस । किरणेही जाती अस्तास । जिकडे जाणे भगवंतास । तिकडे भक्त जाती ।।३५।।

पावसाळ्यात रोज नदीत । पाणी वाढे जोरात । तशी भक्ती वाढता वाढत । प्रेम माझे ।।३६।।

गंगा सागरास मिळते । तरी पुन्हा पुन्हा पाणी येते । तसे भक्तांचे प्रेम वाढते । सतत राहे ।।३७।।

तसे सर्व इंद्रियांसहित । चित्त देऊन भक्ती करित । दिवसरात्र न म्हणत । मला भजती ।।३८।।

अशा प्रकारे जे भक्त । स्वतःला मजसी देत । ते मी योगयुक्त । श्रेष्ठ मानी ।।३९।।

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।

सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ।।३।।

आणि येर तेही पांडवा । जे आरूढोनि सोहंभावा । झोंबती निरवयवा । अक्षरासी ।।४०।।

मनाची नखी न लगे । जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे । इंद्रिया कीर जोगें । काइ होईल ।।४१।।

परि ध्यानाही कुवाडें । म्हणोनि एके ठायीं न संपडे । व्यक्तीसि माजिवडें । कवणेही नोहे ।।४२।।

जया सर्वत्र सर्वपणें । सर्वांही काळीं असणें । जें पावूनि चिंतवणें । हिंपुटी जाहलें ।।४३।।

जें होय ना नोहे । जें नाहीं ना आहे । ऐसें म्हणोनि उपाये । उपजतीचिना ।।४४।।

जें चळे ना ढळे । सरे ना मैळे । तें आपुलेनिचि बळें । आंगविलें जिहीं ।।४५।।

संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।

ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ।।४।।

पैं वैराग्यमहापावकें । जाळूनि विषयांचीं कटकें । अधपलीं तवकें । इंद्रियें धरिलीं ।।४६।।

अक्षर अनिर्देश्य अव्यक्त, निर्गुणा मज उपासिती ।

व्यापक अचिन्त्य अचलाचे, करिती ध्यान स्थिरपणे ।।भावगीता १२.३।।

आणि इतर तेही पांडवा । जे धरूनी सोऽहंभावा । निर्गुण, निरवयवा । भजती जे ।।४०।।

जेथे मना न प्रवेश । बुद्धीच्याही न दिसे डोळ्यांस । इंद्रियांच्या ते दृष्टीस । कसे पडेल ।।४१।।

जे न एका ठिकाणात । न सापडे एका व्यक्तीत । म्हणुनी कठीण जे होत । ध्यान करण्याला ।।४२।।

जे सर्वत्र सर्व होई । सर्व काळी राही । ध्याना न गवसे काही । चिंतनशक्तीही हरे ।।४३।।

जे उगवते ना नाशते । नाही आहेसे होते । कसे मिळवावे तयाते । उपाय नसे ।।४४।।

असे ब्रह्म चालते न हालते । न मळते न संपते । स्वाधीन केले ब्रह्म ते । साधनेने ज्यांनी ।।४५।।

इंद्रिय-संयम साधूनी, सर्वत्र समबुद्धिने ।

राबती सर्वहितासाठी, ते भक्त मज पावती ।।भावगीता १२.४।।

ज्यांनी वैराग्याच्या अग्नीने । जाळिली विषयांची सैन्ये । होरपळती इंद्रिये धैर्याने । आवरली ।।४६।।

मग संयमाची धाटी । सूनि मुरडिलीं उफराटीं । इंद्रियें कोंडिलीं कपाटीं । हृदयाचां ।।४७।।

अपानींचिया कवाडा । लावोनि आसनमुद्रा सुहाडा । मूळबंधाचा हुडा । पन्नासिला ।।४८।।

आशेचे लाग तोडिले । अधैर्याचें कडे झाडिले । निद्रेचें शोधिलें । काळवखें ।।४९।।

वज्राग्नीचां ज्वाळीं । करूनि अपानधातूंची होळी । व्याधींचां सिसाळीं । पूजिलीं यंत्रें ।।५०।।

मग कुंडलिनियेचा टेंभा । आधारीं केला उभा । तया चोजवलें प्रभा । निमथावरी ।।५१।।

नवद्वारांचां चौचकीं । बाणूनि संयतीची आडवंकी । उघडली खिडकी । ककारांतींची ।।५२।।

प्राणशक्तिचामुंडे । प्रहारूनि संकल्पमेंढे । मनोमहिषाचेनि मुंडें । दिधलीं बळी ।।५३।।

चंद्रसूर्यां बुझावणी । करूनि अनाहताची सुडावणी । सतराविये्चें पाणी । जिंतिलें वेगें ।।५४।।

मग मध्यमामध्यविवरें । तेणें कोरिवें दादरें । ठाकिलें चवरें । ब्रह्मरंध्रीचें ।।५५।।

वरी मकारांत सोपान । तें सांडोनिया गहन । कारवे सूनियां गगन । भरलें ब्रह्मीं ।।५६।।

ऐसेन जे समबुद्धी । गिळावया सोहंसिद्धी । आंगवितााति निरवधी । योगदुर्गे ।।५७।।

मग ती इंद्रिये कोंडिली । निश्चयाच्या पाशाने बांधली । अंतर्मुख करून घातली । हृदयखोलीत ।।४७।।

गुदद्वारी अपानी । आसनमुद्रा लावोनी । मूळबंध बुरूज करोनी । उभारिला ।।४८।।

आशेचा संबंध तोडिला । भीतीचा कडा ढासळिला । निद्रेचा नष्ट केला । काळोख सारा ।।४९।।

मूळबंधाच्या अग्नीने जाळिल्या । शरीरधातूंच्या होळ्या केल्या । व्याधींच्या मस्तकांनी पूजिल्या । शरीरस्थ देवता ।।५०।।

कुंडलिनीचा टेंभा केला । तो आधारचक्रावर रोविला । त्याने प्रकाशित मार्ग झाला । ब्रह्मरंध्रापर्यंतचा ।।५१।।

शरीराच्या नवद्वारात । संयमाचे अडसर घालीत । खिडकी उघडून टाकीत । सुषुम्ना नाडीची ।।५२।।

पुढे चामुंडा देवी प्राणरूप । तिला मेंढा संकल्परूप । तसा मारुनी रेडा मनरूप । बळी दिले ।।५३।।

चंद्रसूर्य नाड्या सुषुम्नेत । प्रवेशवुनी शब्द अनाहत । मिळविले सतरावीचे चंद्रामृत । अत्यंत वेगाने ।।५४।।

पोकळीतील सुषुम्ना नाडीच्या । चढून पायऱ्या जिन्याच्या । शिखरी ब्रह्मरंध्राच्या । गाठती अखेरीस ।।५५।।

मकार मात्रा शेवट । ओलांडून ती पायरी बिकट । पोकळीतील ब्रह्म शेवट । गाठती टाळूतिल ।।५६।।

सोऽहंभाव ब्रह्मऐक्य साधावया । समबुद्धीने जीवन जगूनिया । चढती निकराने गाठावया । योगदुर्ग दुर्गम ।।५७।।

आपुलिया साटोवाटी । शून्य घेती उठाउठी । तेही मातेंचि किरीटी । पावती गा ।।५८।।

वांचूनि योगाचेनि बळें । अधिक कांहीं मिळे । ऐसें नाहीं आगळें । कष्टचि तया ।।५९।।

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।

अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ।।५।।

जिहीं सकळभूतांचां हितीं । निरालंबीं अव्यक्तीं । पसरलिया आसक्ती । भक्तीवीण ।।६०।।

तयां महेंद्रादि पदें । करिताति वाटवधें । आणि ऋद्धिसिद्धींचीं द्वंद्वें । पडोनि ठाती ।।६१।।

कामक्रोधांचे विलग । उठावती अनेग । आणि शून्येंसीं आंग । जुंझवावें कीं ।।६२।।

ताहाने ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वावीं । मवावा वारा ।।६३।।

उन्मिद्रेयाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें । झाडासि साजणें । चाळावें गा ।।६४।।

शीत वेढावें । उष्ण पांघुरावें । वृष्टीचिया असावें । घराआंतु ।।६५।।

किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेशु नीच नवा । भ्रतारेंवीण करावा । तो हा योगु ।।६६।।

स्वतःचा मोबदला देत । निर्गुणप्राप्तीसाठी त्वरित । तेही अर्जुना येत । योगी मजजवळी ।।५८।।

अन्यथा योगमार्गाने कठीण । काही अधिक प्राप्ती न होय जाण । उलट कष्ट दारुण । पदरी पडती ।।५९।।

निर्गुणाची अशी प्राप्ती, देहधारी जिवांसही ।

सगुणोपासकांपेक्षा, ठरते क्लेशदायक ।।भावगीता १२.५।।

सोपी भक्ती सोडून । अव्यक्त ब्रह्म निर्गुण । मिळण्याची आसक्ती धरून । बसती काही योगी ।।६०।।

त्यांची वाटमारी इंद्रादि करिती । ऋद्धिसिद्धींची सुखदुःखे येती । मोक्षमार्गी आड पडती । योगियांच्या ।।६१।।

कामक्रोध उफाळती । नाना परी त्रास देती । निराकाराशी झगडा मांडिती । असे लोक ।।६२।।

तहान लागता तीच प्यावी । भुकेजता भूक खावी । वाऱ्याची मापे घ्यावी । हाताने अहोरात्र ।।६३।।

जागणे हेच जिथे झोपणे । निग्रह हेच उपभोगणे । झाडांशी मैत्री करणे । हेच बोलणे ।।६४।।

गारठा अंगी नेसावा । उकाडा पांघरावा । पावसाच्या घरी घ्यावा । पाऊस पडता आसरा ।।६५।।

काय सांगू पांडवा । पतीवीण सतीने करावा । अग्निप्रवेश रोज नवा । तसा हा योग ।।६६।।

एथ स्वामीचें काज । ना बा पिकें व्याज । परि मरणेंसीं जुंझ । नीच नवें ।।६७।।

ऐसें मृत्यूहूनि तिख । कां घोंटे कढत विख । डोंगर गिळितां मुख । न फाटे काई ।।६८।।

म्हणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वाटा । भागा आला ।।६९।।

पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरिया पडती खाणें । तैं पोट भरणें कीं प्राणें । शुद्धी म्हणों ।।७०।।

म्हणोनि समुद्र बाहीं । तरणें आथि केंही । कां गगनामाजीं पाईं । खोलिजतु असे ।।७१।।

वळघलिया रणाची थाटी । आंगीं न लगतां काठी । सूर्याची पाउटी । कां होय गा ।।७२।।

यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा । तेवीं देहवंता जीवां । अव्यक्तीं गति ।।७३।।

ऐसाही जरी धिंवसा । बांधोनियां आकाशा । झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ।।७४।।

म्हणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोटंगले ।।७५।।

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ।।६।।

यात पुन्हा पती न मिळे । मिळती न कुठली पुण्यफळे । लढावे मात्र लागे बळे । मृत्यूशी रोज नवे ।।६७।।

मृत्यूपेक्षा मोठ्या यातना । जणु विष तेही उकळते पिताना । फाटावे डोंगर गिळताना । तोंड जसे ।।६८।।

म्हणुनी हे अर्जुना । योगमार्ग स्वीकारताना । निवडती ते जणु दुःखयातना । माझ्या प्राप्तीसाठी ।।६९।।

पहा लोखंडाचे चणे । बोचऱ्या दातांनी पडले खाणे । म्हणावे याला जेवणे । की प्राण जाणे ।।७०।।

बाहुबळाने समुद्र ओलांडावा । असे घडेल का केव्हा । का पावलांनी मार्ग चालावा । आकाशातील ।।७१।।

युद्धाच्या धुमश्चक्रीत शिरता । काठीचाही मार न पडता । येईल का करुनी जाता । सूर्याची पायरी ।।७२।।

स्पर्धा पांगळ्याची जशी । न होय कधी वाऱ्याशी । देहवंताची स्थिती तशी । निर्गुणापाशी होते ।।७३।।

तरीही ठरविले कुणी धाडसाने । आकाशाला झोंबू जाणे । मग मात्र क्लेश भोगणे । दुःखही तयाने ।।७४।।

म्हणुनी इतर जे पार्था । लोक लागती भक्तिपंथा । त्यांना न या व्यथा । भोगाव्या लागत ।।७५।।

मत्परायण राहूनी, कर्मे जे अर्पिती मला ।
चिन्तिती अनन्यतेने जे, तीच ध्यान उपासना ।।भावगीता १२.६।।

कर्मेंद्रियें सुखें । करिती कर्में अशेखें । जियें कां वर्णविशेखें । भागा आलीं ।।७६।।

विधीतें पाळित । निषेधातें गाळित । मज देऊनि जाळित । कर्मफळें ।।७७।।

ययापरी पाहीं । अर्जुना माझां ठाईं । संन्यासूनि नाहीं । करिती कर्में ।।७८।।

आणीकही जे जे सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव । तयां मीवांचूनि धांव । आनौती नाहीं ।।७९।।

ऐसे जे मत्पर । उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर । माझें झाले ।।८०।।

जयांचिये आवडी । केली मजशीं कुळवाडी । भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ।।८१।।

ऐसे अनन्ययोगें । विकले जीवें मनें आंगें । तयांचें कायि एक सांगें । जें सर्व मी करीं ।।८२।।

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।

भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ।।७।।

किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला पां ।।८३।।

तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां । कळिकाळ नोकोनियां । घेतला पटा ।।८४।।

जे भक्तिमार्गी लागती । त्यांना आश्रमानुसार जी कर्मे येती । ती आनंदे पूर्ण करिती । त्यांची इंद्रिये ।।७६।।

असे भक्त उचित ते करिती । निषिद्ध ते टाळिती । कर्मफळेही जाळिती । मला अर्पुनी ।।७७।।

अशा तऱ्हेने अर्जुना । कर्मे करूनही नाना । नष्ट करिती तयांना । मला ती अर्पुनी ।।७८।।

कायावाचामनांचे भाव । जे जे वाटती सर्व । त्यांचीही सारी धाव । माझ्याचकडे ।।७९।।

माझे ध्यान करिती निरंतर । उपासनेत असे जे मत्पर । त्या ध्यानाने त्यांचे घर । माझे झाले ।।८०।।

माझ्या कुळाशी ज्यांनी । प्रेमे नाते जोडले त्यांनी । भोग, मोक्ष बिचारी दोन्ही । कुळे त्यागिली ।।८१।।

शरीर मन जीव अर्पिला । अनन्यतेने ज्यांनी मला । त्यांचे काय सांगू तुला । सर्व मी करी ।।८२।।

अंतःकरण माझ्यात, ज्यांचे स्थिर असे सदा ।
संसारसागरातुन मी, त्वरेने उद्धरी तया ।।भावगीता १२.७।।

जो आईच्या उदरी येतो । किती आवडतो तिला तो । तसा आवडता मला असतो । भक्त पाही अर्जुना ।।८३।।

मीही त्यांचा होउनी । कळिकाळाला पराजित करुनी । असती तसे जवळ घेउनी । त्यांचा होतो ।।८४।।

एऱ्हवीं तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ।।८५।।

तैसे ते माझें । कलत्र हें जाणिजे । कायिसेनिही न लाजें । तयांचेनि मी ।।८६।।

जन्ममृत्यूचां लाटीं । झळंबती इया सृष्टी । ते देखोनियां पोटीं । ऐसें जाहलें ।।८७।।

भवसिंधूचेनि माजें । कवणासि धाकु नुपजे । येथ जरी कीं माझे । बिहिती हन ।।८८।।

म्हणोनि गा पांडवा । मूर्तीचा मेळावा । करूनि त्यांचिया गांवा । धांवतु आलों ।।८९।।

नामाचिया सहस्रवरी । नावा इया अवधारीं । सजूनियां संसारीं । तारू जाहलों ।।९०।।

सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले । परिग्रही घातले । तरियावरी ।।९१।।

प्रेमाची पेटी । बांधली एकाचां पोटीं । मग आणिले तटीं । सायुज्याचां ।।९२।।

परि भक्तांचेनि नांवें । चतुष्पदादि आघवे । वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ।।९३।।

म्हणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता । तयातें समुद्धर्ता । आथि मी सदा ।।९४।।

आणि जेव्हांचि का भक्तीं । दिधली चित्तवृत्ती । तेव्हांचि मज सूती । तयांचिये नाटीं ।।९५।।

माझ्या भक्तांना नाहीतरी । चिंता नसे संसारी । राजाची राणी कधी तरी । मागेल का भिक्षा ।।८५।।

माझे भक्त असे । पत्नीसमान मला तसे । कमीपण वाटत नसे । त्यांचे पडेल ते करण्या ।।८६।।

जन्ममृत्यूच्या लाटांत । जग गटांगळ्या खात । ते पाहुनी मनात । असे येते ।।८७।।

भवसागर खवळला । मग भय न वाटे कोणाला । भक्त जरी माझा असला । घाबरेल की ।।८८।।

म्हणुनी मी अर्जुना । सगुण रूपे नाना । घेउनी त्यांच्या गावांना । धावत आलो ।।८९।।

हजारो नामांच्या नावा । घेऊन आलो पांडवा । तारावया भक्तजीवा । मी तारु झालो ।।९०।।

असती अधिकारी निर्गुणाचे । तर त्यांना देतो मार्ग ध्यानाचे । संसारी ठेवणीचे । नामनौकेत घेतो ।।९१।।

सगुणाचे प्रेम लावून । एकेका पैलतिरी पोचवून । मोक्षाच्या किनारी सोडून । नेतो सदेहचि ।।९२।।

इतकेच नव्हे जे भक्त । ते पशुआदिक असोत । तरी वैकुंठाचे करीत । अधिकारी तयांना ।।९३।।

अरे म्हणून चिंता नाही । कुठल्या भक्ताला काही । उद्धाराची चिंता वाही । मीच सदा ।।९४।।

जेव्हा ते भक्त झाले । चित्त, अहंकार मला दिले । कधीच आवडते झाले । तेव्हा ते मला ।।९५।।

याकारणें गा भक्तराया । हा मंत्र तुवां धनंजया । कीजे जे यया । मार्गा भजिजे ।।९६।।

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।

निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ।।८।।

अगा मानस हें एक । माझां स्वरूपीं वृत्तिक । करूनि घाली निष्टंक । बुद्धिनिश्चयेंसी ।।९७।।

इयें दोनी सरिसीं । मजमाजीं प्रेमेसीं । रिगालीं तरी पावसी । मातें तूं गा ।।९८।।

जे मन बुद्धि इहीं । घर केलें माझां ठायीं । तरी सांगें मग काई । मी तूं ऐसें उरे ।।९९।।

म्हणोनि दिवा पालवे । सवेंचि तेज मालवे । कां रविबिंबासवें । प्रकाशु जाय ।।१००।।

उचललेया प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं । तैसा मनोबुद्धिपाशीं । अहंकारु ये ।।१०१।।

म्हणोनि माझां स्वरूपीं । मनबुद्धि इयें निक्षेपीं । येतुलेनि सर्वव्यापी । मीचि होसी ।।१०२।।

यया बोला कांहीं । अनारिसें नाहीं । आपली आण पाहीं । वाहतु असें गा ।।१०३।।

म्हणुनी भक्तराया तुला । भक्तिमार्गाचा मंत्र दिला । सोपा आचरण्याला । पहा अर्जुना ।।९६।।

माझ्यात मन तू ठेव, तशी बुद्धीहि ठेवि तू ।

माझ्यात राहता निःसंशय, उद्धार तव होइल ।।भावगीता १२.८।।

बुद्धीचा निश्चय करुनी । वृत्तीसह मन आणुनी । ठेवी अखंड स्थिर करुनी । स्वरूपात माझ्या ।।९७।।

मन, बुद्धी बरोबर । दोन्ही प्रेमाने खरोखर । आली माझ्यात प्रवेशण्या जर । गाठशीलच मला ।।९८।।

कारण बुद्धी तसे मन । माझ्यात स्थिर राहुन । जगल्यास मी-तू दोन । वेगळे न उरे ।।९९।।

दिवा विझता वाऱ्याने । तेज जाते बरोबरीने । प्रकाशही जाई सोबतीने । सूर्यबिंब मावळता ।।१००।।

जसा जाता प्राण । इंद्रियेही जाती मागून । मनबुद्धी जाता जाण । मागून अहंकारही जाई ।।१०१।।

म्हणून माझ्या स्वरूपात । मनबुद्धी ठेवित । त्याने सर्वव्यापी तू होत । माझ्यासारखा ।।१०२।।

मी सत्य गेलो बोलून । सांगे नसे वेगळे याहून । बोलतो शपथ वाहून । हे खरे पहा ।।१०३।।

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाऽऽप्तुं धनंजय ।।९।।

अथवा हें चित्त । मनबुद्धीसहीत । माझां हातीं अचुंबित । न शकसी देवों ।।१०४।।
तरि गा ऐसें करीं । यां आठां पाहारांमाझारीं । मोटकें निमिषभरी । देतु जाय ।।१०५।।
मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं घेईल ।।१०६।।
जैसा शरत्कालु रिगे । आणि सरिता वोहटु लागे । तैसें चित्त काढेल वेगें । प्रपंचौनी ।।१०७।।
मग पुनवेहूनि जैसें । शशिबिंब दिसेंदिसें । हारपत अंवसे । नाहींचि होय ।।१०८।।
तैसें भोगाआंतूनि निगतां । चित्त मजमाजीं रिगतां । हळू हळू पांडुसुता । मीचि होईल ।।१०९।।
अगा अभ्यासयोगु म्हणिजे । तो हा एकु जाणिजे । येणें कांहीं न निपजे । ऐसें नाहीं ।।११०।।
पैं अभ्यासाचेनि बळें । एकां गति अंतराळे । व्याघ्र सर्प प्रांजळे । केले एकीं ।।१११।।
विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे । एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें केलें ।।११२।।

चित्त ना ठेवणे शक्य, जरि माझ्यामधे स्थिर ।

तरी अभ्यासयोगाने, माझी इच्छा धरी बघ ।।भावगीता १२.९।।

किंवा मनबुद्धीसहित । देऊ न शकसी चित्त । निर्लेप, वासनारहित । माझ्या हाती ।।१०४।।

तरी मग असे कर । दिवसाचे आठ प्रहर । त्यातून काढी एक निमिषभर । आणि मला देई ।।१०५।।

मग जे निमिष मला पाहील । खरे सुख अनुभवील । गोडी कमी होईल । त्याची विषयांची ।।१०६।।

जसा शरदऋतू येता । आटू लागे सरिता । तसा प्रपंच नावडता । चित्ता होईल ।।१०७।।

चंद्रबिंब पूर्णिमेचे जसे । हळूहळू कमी होतसे । अमावस्येला पूर्ण नाहीसे । होते पहा ।।१०८।।

प्रपंचभोगातुन बाहेर । येऊन चित्त लागेल मजवर । ते मद्रूप होणार । हळूहळू पांडवा ।।१०९।।

अभ्यासयोग म्हणती याला । जाणावा थोर एकला । काही असाध्य नसे त्याला । कुठे पाही ।।११०।।

कोणी अभ्यास करुनी । चालती आकाशातुनी । सापवाघ वश करुनी । अभ्यासे घेतले ।।१११।।

कुणी विष पचविती । कुणी समुद्रावरून चालती । वेदांवरी अधिकारप्राप्ती । अभ्यासे मिळविती ।।११२।।

म्हणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं । यालागीं माझां ठायीं । अभ्यासें मिळ ।।११३।।

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।

मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ।।१०।।

कां अभ्यासाही लागीं । कसु नाहीं तुझां आंगीं । तरी आहासी जया भंगीं । तैसाचि अस ।।११४।।

इंद्रियें न कोंडीं । भोगातें न तोडीं । अभिमानु न संडीं । स्वजातीचा ।।११५।।

कुळधर्मु चाळीं । विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ।।११६।।

परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापारु होये । तो मी करितु आहें । ऐसें न म्हणे ।।११७।।

करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे । विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ।।११८।।

उणयापुरेयाचें कांहीं । उरों नेदीं आपुलां ठायीं । स्वजातीचि करूनि घेईं । जीवित हें ।।११९।।

माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें । तया पाणिया ऐसें केलें । होआवें गा ।।१२०।।

एऱ्हवीं तरी सुभटा । उजू कां अव्हांटा । रथु काई खटपटा । करितु असे ।।१२१।।

म्हणून सर्वथा पाही । अभ्यासाला अशक्य नाही । माझ्या प्राप्तीसाठीही । अभ्यास करी ।।११३।।

अभ्यास जरि ना शक्य, कर्मे अर्पण करीत जा ।

कर्मे अर्पूनहि ईश्वर, तुजला प्राप्त होइल ।।भावगीता १२.१०।।

किंवा तुझ्या अंगी पाही । अभ्यासाची शक्ती नाही । तरी तसाच राही । जसा असशी ।।११४।।

इंद्रियनिग्रह नको । भोग सोडणे नको । अभिमान टाकणे नको । स्वजातीचा ।।११५।।

कुलधर्म आचरावा । विधिनिषेध पाळावा । उरला सुखभोग घ्यावा । ही मोकळीक ।।११६।।

परी मने, वाचे, देहे । जी कर्मे घडती पाहे । ती मी करीत आहे । असे न म्हणे ।।११७।।

कारण करणे, न करणे । अवघे तोच जाणे । कर्ता परमात्मा जाणणे । ज्याने विश्व चाले ।।११८।।

कर्म उणे वा अधिक जरी । घेऊ नको अपुल्यावरी । स्वधर्मी राहण्यावरी । जीवनी भर देई ।।११९।।

माळी जिकडे नेई । पाणी निवांत तिकडे जाई । त्या पाण्यासारखे होई । जीवनी अपुल्या ।।१२०।।

पहा सरळ की आडवाट । नेई तिकडे जाई रथ नीट । चिंता, शंका, खटपट । न करी वाटेची ।।१२१।।

म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ती । इयें वोझीं नेघें मती । अखंड चित्तवृत्ती । आठवीं मातें ।।१२२।।

आणि जें जें कर्म निपजे । तें थोडें बहु न म्हणिजे । निवांतचि अर्पिजे । माझां ठायीं ।।१२३।।

ऐसिया मद्भावना । तनुत्यागीं अर्जुना । तूं सायुज्यसदना । माझिया येसी ।।१२४।।

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।

सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ।।११।।

ना तरी हेंही तुज । नेदवे कर्म मज । तरी गा तूं भज । पांडुकुमरा ।।१२५।।

बुद्धीचां पाठीं पोटीं । कर्माआदि कां शेवटीं । मातें बांधणें किरीटी । दुवाड जरी ।।१२६।।

तरि हेंही असो । सांडीं माझा अतिसो । परि संयतिसीं वसो । बुद्धि तुझी ।।१२७।।

आणि जेणें जेणें वेळें । घडती कर्में सकळें । तयांचीं तियें फळें । त्यजितु जाय ।।१२८।।

वृक्ष कां वेली । लोटती फळें आलीं । तैसीं सांडीं निपजलीं । कर्में सिद्धें ।।१२९।।

परि मातें मनीं धरावें । कां मजउद्देशें करावें । हें कांहीं नको आघवें । जाऊं दे शून्यीं ।।१३०।।

म्हणून करावे किंवा न करावे । हे ओझे स्वतः न घ्यावे । चित्तवृत्तीने उलट स्मरावे । सतत मला ।।१२२।।

आणि शेवटी जे घडे । ते जादा वा न म्हणे थोडे । अर्पुनी दे माझ्याकडे । निवांतपणे ।।१२३।।

असा भगवद्भाव वाढेल । देहभाव कमी होईल । तसा सायुज्यसदनी येशील । अर्जुना माझ्या ।।१२४।।

करणे वा अर्पण करणे, हेही शक्य नसे जरी ।
करी कर्मफळांचा तू, त्याग निश्चयपूर्वक ।।भावगीता १२.११।।

जरी हे तुला न करवे । कर्म मला न देववे । तरी भक्त कसे व्हावे । ते ऐक अर्जुना ।।१२५।।

मागे पुढे बुद्धीच्या । आदीअंती कर्मांच्या । क्रिया अर्पण-स्मरणाच्या । कठीण जरी तुला ।।१२६।।

तरी हेही राहू दे । अर्पणाचा आग्रह जाऊ दे । परंतु बुद्धीचा निग्रह असू दे । मात्र तुझ्या ।।१२७।।

ज्या ज्या वेळी कर्मे घडती । त्यांना जी फळे येती । ती टाकता येती । ती त्यागीत जा ।।१२८।।

झाडे, वेली जशी । फळे येता टाकती तशी । कर्मे येता पूर्णतेसी । सोडून दे ती ।।१२९।।

माझे स्मरण करुनी करावे । किंवा मजसाठी कर्म करावे । हे दोन्ही न करता टाकावे । कर्म तसेच ।।१३०।।

खडकीं जैसें वर्षलें । कां आगीमाजीं पेरिलें । कर्म मानीं देखिलें । स्वप्न जैसें ॥१३१॥

अगा आत्मजेचां विषीं । जिवु जैसा निरभिलाषी । तैसा कर्मीं अशेषीं । निष्कामु होये ॥१३२॥

वन्हीची ज्वाळा जैशी । वायां जाय आकाशीं । क्रिया जिरों दें तैसी । शून्यामाजीं ॥१३३॥

अर्जुना हा फलत्यागु । आवडे कीर असलगु । परि योगामाजीं योगु । धुरेचा हा ॥१३४॥

येणें फलत्यागें सांडे । तें तें कर्म न विरूढे । एकचि वेळें वेळुझाडें । वांझें जैसीं ॥१३५॥

तैसें येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे । किंबहुना येरझारे । चिरा पडे ॥१३६॥

पैं अभ्यासाचां पाउटीं । ठाकिजे ज्ञान किरीटी । ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ॥१३७॥

मग ध्यानासि खेंव । देती आघवेचि भाव । तेव्हां कर्मजात सर्व । दूरी ठाके ॥१३८॥

कर्म जेथ दुरावे । तेथ फलत्यागु संभवे । त्यागास्तव आंगवे । शांति सगळी ॥१३९॥

म्हणोनि यावया शांति । हाचि अनुक्रम सुभद्रापती । अभ्यासुचि प्रस्तुतीं । करणें एथ ॥१४०॥

खडकावरी पडावा पाऊस । आगीत पेरावे बीजास । व्यर्थ मानिती स्वप्नास । तसे कर्म समज ।।१३१।।

कन्येविषयी अर्जुना । जीवास नसे कामना । तसा सर्व कर्मे करताना । निष्काम रहा ।।१३२।।

आगीची ज्वाळा जशी । विरुनी जाय आकाशी । कर्मे जावोत तशी । शून्यामध्ये ।।१३३।।

हा फलत्याग अर्जुना । सोपा, आवडतो मना । इतर योगांशी करिता तुलना । फार श्रेष्ठ हा ।।१३४।।

वेळू एकदाच वेळू देई । पुन्हा वेळू न येई । फळ त्यागता तसे होई । कर्म न अंकुरे पुन्हा ।।१३५।।

तसे याच देहे पुन्हा देह घेणे । येते संपवता फलत्यागाने । येते येरझारा थांबवणे । जन्ममृत्यूच्या ।।१३६।।

अभ्यासयोगाच्या पायरीने । ज्ञान घडते सहजतेने । ध्यान भेटेल ज्ञानाने । पुढे जाता ।।१३७।।

स्वरूपाचे साधता ध्यान । भाव येती प्रेमे धावून । सर्व कर्मे बाजूला सरून । दूर उभी राहती ।।१३८।।

कर्माचाच अभाव होतो । तेव्हा खरा फलत्याग संभवतो । त्याग शांती साधतो । खरी पूर्ण ।।१३९।।

म्हणून खरी शांती यावया । हाच अनुक्रम धनंजया । अभ्यासचि करावया । लागे इथे ।।१४०।।

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।

ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ।।१२।।

अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान । ज्ञानापासोनि ध्यान । विशेषिजे ।।१४१।।

मग कर्मफलत्यागु । तो ध्यानापासोनि चांगु । त्यागाहूनि भोगु । शांतिसुखाचा ।।१४२।।

ऐसिया या वाटा । इहींचि पेणां सुभटा । शांतीचा माजिवटा । ठाकिला जेणें ।।१४३।।

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।

निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ।।१३।।

जो सर्व भूतांचां ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं । आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ।।१४४।।

उत्तमातें धरिजे । अधमतरि अव्हेरिजे । हें कांहींच नेणिजे । वसुधा जेवीं ।।१४५।।

कां रायाचे देह चाळूं । रंकापरौतें गाळूं । हें न म्हणेचि कृपाळू । प्राणु पैं गा ।।१४६।।

गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेचि का करूं । तोय जैसें ।।१४७।।

श्रेष्ठ अभ्यासाहुनी ज्ञान, श्रेष्ठ ध्यान तयाहुनी ।

त्याहूनही फलत्याग, त्यागातुन शान्ति येतसे ।।भावगीता १२.१२।।

अभ्यासापेक्षा गहन । मग मिळते ते ज्ञान । ज्ञानाहून ध्यान । विशेष असे ।।१४१।।

ध्यानापेक्षा श्रेष्ठतेचा । त्याग कर्मफळाचा । त्याहून श्रेष्ठ शांतिसुखाचा । अनुभव असे ।।१४२।।

भक्त चालती या वाटेने । गाठती शांती क्रमाने । अशा भक्तांची लक्षणे । ऐक अर्जुना ।।१४३।।

निर्वैर, मित्र सर्वांचा, करुणामय, निर्ममहि असे ।

निरहंकार, क्षमाशील, सुखदुःखी समान जो ।।भावगीता १२.१३।।

चैतन्याला नाही जसा । आपला परका भेद असा । लोकांशी भक्त वागे तसा । द्वेष न करी कुणाचा ।।१४४।।

चांगल्याला आधार द्यावा । वाईटाला पाडावा । न जाणे अशा भेदभावा । पृथ्वी जशी ।।१४५।।

चालवू देह राजाचा म्हणून । गरीबाला जाऊ सोडून । म्हणतो का कृपाळू प्राण । असे कधी ।।१४६।।

गाईची भागवू तहान । वाघाला मारू विष होऊन । असे ठाऊक नसे जाण । पाण्याला जसे ।।१४७।।

तैसी आघवांचि भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री । कृपेशीं धात्री । आपणपां जो ।।१४८।।

आणि मी तूं हे भाष नेणे । माझें कांहींचि न म्हणे । सुख दुःख जाणणें । नाहीं जया ।।१४९।।

तेवींचि क्षमेलागीं । पृथ्वीसि पवाडु आंगीं । संतोषा उत्संगीं । दिधलें घर ।।१५०।।

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।

मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ।।१४।।

वार्षियेंवीण सागरु । जैसा जळें नित्य निर्भरु । तैसा निरुपचारु । संतोषी जो ।।१५१।।

वाहूनि आपुली आण । धरी जो अंतःकरण । निश्चया साचपण । जयाचेनि ।।१५२।।

जीवु परमात्मा दोन्ही । बैसोनि ऐक्यासनीं । जयाचां हृदयभुवनीं । विराजती ।।१५३।।

ऐसा योगसमृद्धि । होऊनि जो निरवधि । अर्पी मनोबुद्धि । माझां ठायीं ।।१५४।।

आंतु बाहेरि योगु । निर्वाळलेयाही चांगु । तरि माझा अनुरागु । सप्रेम जया ।।१५५।।

अर्जुना गा तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु । तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ।।१५६।।

सर्व भूतमात्रांशी । मैत्री जयाची अशी । स्वतःच कृपेची अशी । जन्मभूमी जो ।।१४८।।

मी तू ही भाषा नाही । माझे न म्हणे काही । सुखदुःखाची जाणीव नाही । असा जो ।।१४९।।

क्षमेत पृथ्वीसमान । थोर ज्याचे मन । मांडीवरी घर दिले जाण । ज्याने संतोषाला ।।१५०।।

सदा संतुष्ट, तत्पर जो, निग्रही, दृढनिश्चयी ।
अर्पितो मज मनोबुद्धी, तो भक्त मजला प्रिय ।।भावगीता १२.१४।।

जरी पाऊस न पडत । तरी सागर पाण्याने नित्य तृप्त । तसा काही न मिळत । तरी संतुष्ट जो ।।१५१।।

आवरी जो अंतःकरण । आपुली शपथ घालून । त्यामुळे निश्चयाला खरेपण । त्याच्या येई ।।१५२।।

जीव, परमात्मा दोन्ही । आनंदे एका आसनी । ज्याच्या हृदयभुवनी । विराजती ।।१५३।।

असा अखंड ऐक्याने । झाला समृद्ध योगाने । मनबुद्धी नित्याने । अर्पी मला ।।१५४।।

अंतर्बाह्य योगात । झाला जरी निष्णात । तरी माझ्या सगुणरूपात । त्याला प्रेम वाटे ।।१५५।।

अर्जुना तो खरा भक्त । तोच योगी तोचि मुक्त । पत्नी पतीला आवडत । तेवढा तो मला ।।१५६।।

हें ना तो आवडे । मज जीवाचेनि पाडें । हेंहीं एथ थोडें । रूप करणें ।।१५७।।

तरी पढियंतयाची कहाणी । हे भुलीची भारणी । इयें तंव न बोलणीं । परि बोलवी श्रद्धा ।।१५८।।

म्हणोनि गा आम्हां । वेगा आली उपमा । एऱ्हवीं काय प्रेमा । अनुवादु असे ।।१५९।।

आतां असो हें किरीटी । पैं प्रियाचिया गोष्टी । दुणा थांव उठी । आवडी गा ।।१६०।।

तयाही वरी विपायें । प्रेमळु संवादिया होये । तिये गोडीसी आहे । कांटाळें मग ।।१६१।।

म्हणोनि गा पांडुसुता । तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता । वरी प्रियाची वार्ता । प्रसंगें आली ।।१६२।।

तरी आतां बोलों । भले या सुखा मीनलों । ऐसें म्हणतखेंवीं डोलों । लागले देवो ।।१६३।।

मग म्हणे जाण । तया भक्ताचें लक्षण । जया मी अंतःकरण । बैसों घालीं ।।१६४।।

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।

हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ।।१५।।

तरी सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे । आणि जळचरीं नुबगिजे । समुद्रु जैसा ।।१६५।।

एवढ्यापेक्षाही तो । स्वतःइतका आवडतो । उपमेला पुरा न पडतो । दृष्टान्त इथे ।।१५७।।

भक्तांच्या वर्णनात । मला भूल पडत । अन्यथा असे न बोलत । पण प्रेम बोलवी ।।१५८।।

भक्तांचे वर्णन करिता । वेगाने दिले दृष्टान्ता । एरवी प्रेम नीट सांगता । येते का कधी ।।१५९।।

वाटे असू दे हे आता । पण भक्तांच्या गोष्टी बोलता । भरते येते चित्ता । आवडीने ।।१६०।।

त्यातही पहा क्वचित । ज्याच्याशी बोलावे असा मिळत । मग काय येत । कंटाळा कधी ।।१६१।।

म्हणुनी पंडुसुता । तूचि प्रिय भक्त, तूचि श्रोता । त्यांत प्रसंगे निघता । भक्तीच्याच गोष्टी ।।१६२।।

भक्तांवर बोलणे निघाले । परमात्माही डोलू लागले । म्हणती हे योग आले । मलाच सुखाचे ।।१६३।।

भक्तांना बसण्या आसन । घालितो माझे अंतःकरण । अशा भक्तांची लक्षणे अजून । सांगतो म्हणती ।।१६४।।

लोकांचा त्रास ना ज्याला, लोक ना त्रासती जया ।

उद्वेगरागभयहर्ष, यांतून मुक्त तो प्रिय ।।भावगीता १२.१५।।

जळचर न घाबरती । जरी सागर खवळती । सागर न कंटाळती । जळचरा ।।१६५।।

तेविं उन्मत्तें जगें । जयासि खंती न लगे । आणि जयाचेनि आंगें । न शिणे लोकु ॥१६६॥

किंबहुना पांडवा । शरीर जैसे अवयवां । तैसा नुबगे जीवां । जीवपणें जो ॥१६७॥

जगचि देह जाहलें । म्हणोनि प्रियाप्रिय गेलें । हर्षामर्ष ठेले । दुजेनविण ॥१६८॥

ऐसा द्वंद्वनिर्मुक्तु । भयोद्वेगरहितु । याही वरि भक्तु । माझां ठायीं ॥१६९॥

तरि तयाचा गा मज मोहो । काय सांगों तो पढियावो । हें असो जीवें जीवो । माझेनि तो ॥१७०॥

जो निजानंदें धाला । परिणामु आयुष्या आला । पूर्णते जाहला । वल्लभु जो ॥१७१॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।

सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१६॥

जयाचां ठायीं पांडवा । अपेक्षे नाहीं रिगावा । सुखासि चढावा । जयाचें असणें ॥१७२॥

मोक्ष देऊनि उदार । काशी होय कीर । परि वेचे शरीर । तिये गांवीं ॥१७३॥

हिमवंतु दोष खाये । परि जीविताची हानि होये । तैसें शुचित्व नोहे । सज्जनाचें ॥१७४॥

जरी जग झाले उन्मत्त । तरी जो ना खंत करित । लोकही ना कंटाळत । ज्याला कधी ।।१६६।।

फार काय अर्जुना । शरीर जसे अवयवांना । आपुलेच म्हणुन कंटाळेना । तसा जीवांना कधी तो ।।१६७।।

जग जणु अपुला देह । असा झाल्याने भाव । नसे प्रियअप्रिय जीव । ना आनंद, मत्सर ।।१६८।।

असा द्वंद्वातून मुक्त । भय आणि उद्वेगरहित । होऊन शिवाय भक्त । अनन्य माझा ।।१६९।।

अशा भक्ताचा मोह मला । आवडता तो मला झाला । माझ्या प्रेमावरी जगे भला । काय सांगू ।।१७०।।

जो निजानंदाने तृप्त झाला । ब्रह्म होऊन जन्मा आला । पूर्णतेचा पती झाला । जणू काही ।।१७१।।

निरपेक्ष, पवित्र, तत्पर, चिंतामुक्त, तटस्थ जो ।

त्यागी कर्मफलांचा जो, तो भक्त मज आवडे ।।भावगीता १२.१६।।

ज्याच्या मनी पांडवा । अपेक्षेला नाही शिरकावा । आत्मसुखाचा उत्कर्ष व्हावा । ज्याच्या जगण्याने ।।१७२।।

मोक्ष देण्यात खरोखर । काशी आहे उदार । परंतु लागते शरीर । पडावे तिथे ।।१७३।।

हिमालय करी पापनाश । परी धोका जिवास । भक्ताच्या पवित्रपणात कुणास । नसती धोके ।।१७४।।

शुचि शुचि गांग होये । आणि पाप तापही जाये । परि तेथें आहे । बुडणें एक ॥१७५॥

खोलिये पारु नेणिजे । तरी भक्तीं न बुडिजे । रोकडाचि लाहिजे । न मरतां मोक्षु ॥१७६॥

संताचेनि अंगलगें । पापातें जिणणें गंगें । तेणें संतसंगे । शुचित्व कैसे ॥१७७॥

म्हणोनि असो जो ऐसा । शुचित्वें तीर्थां कुवासा । जेणें लंघविले दिशा । मनोमळ ॥१७८॥

आंतु बाहेरि चोखाळु । सूर्य तैसा उजाळु । आणि तत्त्वार्थींचा पायाळु । देखणा जो ॥१७९॥

व्यापक आणि उदास । जैसें कां आकाश । तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ॥१८०॥

संसारव्यथे फिटला । जो नैराश्यें विनटला । व्याधाहातोनि सुटला । विहंगमु जैसा ॥१८१॥

तैसा सतत जो सुखे । कोणीही टवंच न देखे । नेणिजे गतायुषें । लज्जा जेवीं ॥१८२॥

आणि कर्मारंभालागीं । जया अहंकृती नाहीं आंगीं । जैसा निरिंधन आगी । विझोनि जाय ॥१८३॥

तैसा उपशमुचि भागा । जयासि आला पैं गा । जो मोक्षाचिया आंगा । लिहिला असे ॥१८४॥

अर्जुना हा ठावोवरी । जो सोहंभावो सरोभरी । तो द्वैताचां पैलतीरीं । निगों सरला ॥१८५॥

गंगेच्या स्नानात पवित्रपण । पापतापांचे होय हरण । पण बुडी द्यावी जाण । लागते तेथे ।।१७५।।

सखोल असती संत । परी साधक न बुडती संगतीत । रोकडा मोक्ष पडे पदरात । न मरता तेथे ।।१७६।।

संतांच्या संगतीत । गंगेचीच पापे जात । अशा संतभक्तांच्या संगतीत । किती पावित्र्य असेल ।।१७७।।

म्हणुनी असा जो भक्त । तीर्थांना तीर्थपण देत । संगतीने मनोमळ घालवीत । देशांतरी ।।१७८।।

सूर्य झळाळे जसा । अंतर्बाह्य पवित्र तसा । अज्ञानभूमीतला देव पहाण्यात तसा । दक्ष पायाळू जो ।।१७९।।

व्यापक तरी उदासीन । राही जसे गगन । तसे ज्याचे असे मन । सर्वत्र पाही ।।१८०।।

आशा नसल्याने मनाला । संसारव्यथा नसती त्याला । शिकाऱ्याहातून सुटला । जणू पक्षी ।।१८१।।

त्रास-दुःख न होत । उलट जो सुखात सतत । लज्जा न जाणे प्रेत । जसे कधी ।।१८२।।

कर्मासाठी लागे अहंता । तो कर्मत्याग साधे ती नसता । लाकडे विझती नसता । अग्नी जसा ।।१८३।।

ज्याचा अहंकार विझला । तो शांती पावला । मोक्षवर्गात दाखल झाला । प्रिय भक्त माझा ।।१८४।।

सोहंभाव सरोवराच्या । तो-मी या द्वैताच्या । पैलतीरी निघाला अद्वैताच्या । अर्जुना तो ।।१८५।।

कीं भक्तिसुखालागीं । आपणपेंचि दोही भागीं । वांटूनिया आंगीं । सेवकै बाणी ।।१८६।।

येरा नाम मी ठेवी । मग भजती वोज बरवी । न भजतया दावी । योगिया जो ।।१८७।।

तयाचें आम्हां व्यसन । आमुचें तो निजध्यान । किंबहुना समाधान । तो मिळे तैं ।।१८८।।

तयालागीं मज रूपा येणें । तयाचेनि मज एथें असणें । तया लोण कीजे जीवें प्राणें । ऐसा पढिये ।।१८९।।

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।

शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ।।१७।।

जो आत्मलाभासारिखें । गोमटें कांहींचि न देखे । म्हणोनि भोगविशेखें । हरिखेजेना ।।१९०।।

आपणचि विश्व जाहला । तरि भेदभावो सहजचि गेला । म्हणोनि द्वेषु ठेला । जया पुरुषा ।।१९१।।

पैं आपुलें जें साचें । तें कल्पांतींही न वचे । हें जाणोनि गताचें । न शोची जो ।।१९२।।

आणि जयापरौतें कांहीं नाहीं। तें आपणपेंचि आपुलां ठायीं। जाहला यालागीं जो कांहीं । आकांक्षी ना ।।१९३।।

वोखटें कां गोमटें । हें कांहींचि तया नुमटे । रात्रिदिवस न घटे । सूर्यासि जेवीं ।।१९४।।

परंतु स्वतःचे भाग करितो । तो भक्त, मी देव समजतो । सेवा स्वतःकडे घेतो । भक्तिसुखासाठी ।।१८६।।
तो अद्वैती योगी असुनी । इतरांना देव समजुनी । अभक्तांना दाखवितो आचरुनी । भक्ती आणि भजन ।।१८७।।
छंद आम्हा अशा भक्ताचा । तो आमचा विषय ध्यानाचा । तो भेटता येतो आनंदाचा । अनुभव आम्हा ।।१८८।।
त्याच्यासाठी सगुण होतो । त्याच्यासाठी मी जगी राहतो । जीवप्राण ओवाळावा वाटतो । इतका तो आवडे ।।१८९।।

नसे हर्ष, नसे द्वेष, शोक वा वासना नसे ।
शुभाशुभ फळे त्यागी, भक्तिमान् तो मला प्रिय ।।भावगीता १२.१७।।

आत्मलाभाच्या तोडीचे । काहीच नसे जगीचे । म्हणुनी कुठल्या शरीरसुखाचे । विशेष न वाटे ।।१९०।।
स्वतःच विश्व झाला । म्हणुनी भेदभाव गेला । मग द्वेष न उरला । त्याला कुणाचा ।।१९१।।
जे खरे आपुले आहे । कल्पान्ती न जाई पाहे । म्हणूनी गेल्याचा शोक नोहे । त्याला कधी ।।१९२।।
ज्यापलीकडे काही नसे । ते समाधान अपुले असे । कशाची आकांक्षा नसे । त्यामुळे त्याला ।।१९३।।
रात्र असो वा दिवस । सर्व एक सूर्यास । तसे शुभ-अशुभ तयास । न वाटे कधी ।।१९४।।

ऐसा बोधुचि केवळु । जो होऊनि निष्कळु । त्याहीवरी भजनशीळु । माझां ठायीं ।।१९५।।

तरि तया ऐसें दुसरें । आम्हां पढियंतें सोयरें । नाहीं गा साचोकारें । तुझी आण ।।१९६।।

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।

शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ।।१८।।

पार्था जयाचां ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं । रिपुमित्रां दोहीं । सरिसा पाडु ।।१९७।।

कां घरिचियां उजियेडु करावा । पारखियां आंधारु पाडावा । हें नेणेचि गा पांडवा । दीपु जैसा ।।१९८।।

जो खांडावया घावो घाली । कां लावणी जयानें केली । दोघां एकचि साउली । वृक्ष दे जैसा ।।१९९।।

नातरी इक्षुदंडु । पाळितया गोडु । गाळितया कडु । नोहेचि जेवीं ।।२००।।

अरिमित्रीं तैसा । अर्जुना जया भावो ऐसा । मानापमानीं सरिसा । होतु जाय ।।२०१।।

तिहीं ऋतूं समान । जैसें कां गगन । तैसें एकचि मान । शीतोष्णीं जया ।।२०२।।

दक्षिण उत्तर मारुता । मेरु जैसा पांडुसुता । तैसा सुखदुःखप्राप्ता । मध्यस्थु जो ।।२०३।।

असा बोध झाला । पूर्णपणे त्याला । त्यातही भजनशील राहिला । माझ्या ठिकाणी ।।१९५।।

त्याच्यासारखा आम्हा दुसरा । आवडता सोयरा । नसे कुणी धनुर्धरा । तुझ्या शपथ ।।१९६।।

मानापमान सम मानी, सम शत्रू तसे सखे ।

शीतोष्णसुखदुःखात, अनासक्त, समान जो ।।भावगीता १२.१८।।

अर्जुना, तो देई मान । शत्रुमित्रांना समान । भेदभावा नसे स्थान । त्याच्या ठायी ।।१९७।।

उजेड द्यावा घरच्यांना । अंधार करावा परक्यांना । हे न जाणे अर्जुना । दिवा जसा ।।१९८।।

वृक्ष लाविला ज्याने । किंवा तोडी जो घावाने । दोघांना एक सावली प्रेमाने । वृक्ष दे जसा ।।१९९।।

किंवा कडू गाळणाऱ्याला । गोड मात्र लावणाऱ्याला । स्थान न देई भेदाला । ऊस जसा ।।२००।।

शत्रुमित्रा समान । तसे मानापमान । वागणूक देई ज्याचे मन । सारखी दोघांना ।।२०१।।

तिन्ही ऋतूंत समान । जसे राही गगन । तसा शीतउष्णासि मान । एकचि देई ।।२०२।।

वारा उत्तर वा दक्षिण असत । अचल राही मेरुपर्वत । तसा समान सुखदुःखात । राही जो ।।२०३।।

माधुर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां समु ।।२०४।।

आघविया जगा एक । सेव्य जैसें उदक । तैसें तयांतें तिन्हीं लोक । आकांक्षिती ।।२०५।।

जो सबाह्यसंगु । सांडोनिया लागु । एकाकी असे आंगु । आंगीं सूनी ।।२०६।।

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।

अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ।।१९।।

जो निंदेतें नेघे । स्तुति न श्लाघे । आकाशा न लगे । लेपु जैसा ।।२०७।।

तैसें निंदे आणि स्तुती । मानु करूनि एके पांती । विचरे प्राणवृत्ती । जनीं वनीं ।।२०८।।

साच लटिकें दोन्ही । बोलोनि न बोले जाहला मौनी । जे भोगितां उन्मनी । आरायेना ।।२०९।।

जो यथालाभें न तोखे । अलाभें न पारुखे । पाउसेंवीण न सुके । समुद्रु जैसा ।।२१०।।

आणि वायूसि एके ठायीं । बिढार जैसें नाहीं । तैसा न धरीच केंहीं ।आश्रयो जो ।।२११।।

आघवाचि आकाशस्थिति । जेवीं वायूसि नित्य वसति । तेवीं जगचि विश्रांति-। स्थान जया ।।२१२।।

मधुर चांदणे पडते । राजारंका एकच शांती देते । तसे वागणे एकच असते । त्याचे सर्वांशी ।।२०४।।

सर्व जगाला एक । पिण्यास आवडे उदक । तसे त्याच्यावरी तीन्ही लोक । प्रेम करिती ।।२०५।।

मात्र तो आसक्ती सोडून । अंतर्बाह्य संग त्यागून । ब्रह्मलीन होऊन । एकांती असे ।।२०६।।

सम निंदास्तुती ज्याला, मौनी, संतुष्ट कशातही ।

अनिकेत स्थिरबुद्धीचा, असा भक्त मला प्रिय ।।भावगीता १२.१९।।

जो न होय खिन्न निंदेने । आनंदे न स्तुतीने । आकाश न लेपे रंगाने । कुठल्याही ।।२०७।।

एका पंगतीचा मान । देई निंदास्तुतीला जाण । फिरे प्राणासमान । जनी वा वनी ।।२०८।।

खरेखोटे दोन्ही । काही न बोले मौनी । उन्मनीचा आनंद सोडुनी । खाली न येई ।।२०९।।

मिळण्याने ना आनंदत । न मिळता खिन्नही न होत । पाऊस न पडता न आटत । समुद्र जसा ।।२१०।।

आणि वायूला बिऱ्हाड जसे । एका ठिकाणी नसे । आश्रयाला तो न वसे । एका ठिकाणी ।।२११।।

अवघ्या आकाशात । वायू जसा राहात । जगचि विश्रांतिस्थान बनत । ज्या भक्ताला ।।२१२।।

हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला ।।२१३।।

मग याहीवरी पार्था । माझां भजनीं आस्था । तरी तयातें मी माथां । मुकुट करीं ।।२१४।।

उत्तमासि मस्तक । खालविजे हें काय कौतुक । परि मानु करिती तिन्ही लोक । पायवणिया ।।२१५।।

तरि श्रद्धावस्तूसि आदरु । करिता जाणिजे प्रकारु । जरी होय श्रीगुरु । सदाशिवु ।।२१६।।

परि हें असो आतां ।महेशातें वानितां । आत्मस्तुति होता । संचारु असे ।।२१७।।

ययालागीं हें नोहे । म्हणितलें रमानाहें । अर्जुना मी वाहें । शिरीं तयातें ।।२१८।।

जे पुरुषार्थसिद्धि चौथी । घेऊनि आपुलां हातीं । रिगाला भक्तिपंथीं । जगा देतु ।।२१९।।

कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडीबांधी करी । कीं जळाचिये परी । तळवटु घे ।।२२०।।

म्हणोनि गा नमस्कारूं । तयातें आम्ही माथां मुकुट कुरूं । तयाची टांच धरूं । हृदयीं आम्ही ।।२२१।।

तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणी । तयाची कीर्ति श्रवणीं । आम्ही लेऊं ।।२२२।।

तो पहावा हे डोहळे । म्हणोनि अचक्षूसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पुजूं तयातें ।।२२३।।

हे विश्वचि माझे घर । अशी मती ज्याचि स्थिर । किंबहुना चराचर । आपण झाला ।।२१३।।

इतका थोर जो झाला । शिवाय भक्तीचे प्रेम ज्याला । मस्तकी मुकुट त्याला । मी करी ।।२१४।।

थोरापुढे माथा नमवण्याचे । काय विशेष का कौतुकाचे । पण पाणी घेई पायाचे । त्रैलोक्य त्याच्या ।।२१५।।

श्री शंकरासम गुरू लाभता । कसा आदर येतो करता । तो प्रकार जाणता । येतो खरा ।।२१६।।

शंकर मानती गुरू मला। माझ्या चरणोदक गंगेला। शिरी धरिती,हे सांगता मला। आत्मस्तुतीचा दोष।।२१७।।

म्हणुनी त्या न करी वर्णना । शिरी धरितो भक्तांना । एवढेच ध्यानी घेई अर्जुना । कृष्ण म्हणती ।।२१८।।

मोक्ष पुरुषार्थ चौथा । घेउनी आपुल्या हाता । देत निघाला जगता । भक्तिपंथाने ।।२१९।।

स्वतः मोक्षाचा अधिकारी । इतरांनाही मुक्त करी । योग्यता एवढी तरी । पाण्यापरी नम्र असे ।।२२०।।

मी त्याला नमस्कार करितो । माथ्याचा मुकुट करितो । त्याचे पाय धरितो । हृदयी मी ।।२२१।।

त्याचे गुण वर्णितो । तो अलंकार वाणीला घालितो । कानांचा अलंकार वाटतो । कीर्ती ऐकणे त्याची ।।२२२।।

नसता डोळे धरितो । प्रेमे त्याला पाहतो । हातीच्या लीलाकमळाने करितो । पूजा त्याची ।।२२३।।

दोंवरी दोनी । भुजा आलों घेउनी । आलिंगावयालागुनी । तयाचें आंग ।।२२४।।

तया संगाचेनि सुरवाडें । मज विदेहा देह धरणें घडे । किंबहुना आवडे । निरुपमु ।।२२५।।

तेणेंसीं आम्हां मैत्र । एथ कायसें विचित्र । परि तयाचें चरित्र । ऐकती जे ।।२२६।।

तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ।।२२७।।

जें हें अर्जुना साद्यंत । सांगितलें प्रस्तुत । भक्तियोगु समस्त । योगरूप ।।२२८।।

जे मी प्रीति करीं । कां मनीं शिरसा धरीं । येवढी थोरी । जया स्थितीये ।।२२९।।

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।

श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ।।२०।।

ते हे गोष्टी रम्य । अमृतधारा धर्म्य । करिती प्रतीतिगम्य । आइकोनि जे ।।२३०।।

तैसीचि श्रद्धेचेनि आदरें । जयांचां ठायीं विस्तरे । जीवीं जया थारे । जे अनुष्ठिती ।।२३१।।

परि निरूपली जैसी । तैसीच स्थिति मानसीं । मग सुक्षेत्रीं जैसी । पेरणी केली ।।२३२।।

आणखी दोन हात घेऊन । चतुर्भुज आलो होऊन । त्याला द्यावया आलिंगन । जवळ घेऊनी ।।२२४।।

त्याच्या संगतीत आनंद असतो । तो घेण्या मी देह धरितो । मला किती तो आवडतो । उपमा नसे ।।२२५।।

त्याची माझी मैत्री घडे । यात काय एवढे । विशेष आहे पुढे । ते ऐक अर्जुना ।।२२६।।

त्याचे चरित्र जे ऐकती । तेही मज आवडती । जे त्याची प्रशंसा करिती । तेही मज आवडती ।।२२७।।

हो योगरूप समस्त । भक्तियोग मांडिला प्रस्तुत । सविस्तर साद्यंत । सांगितला तुला ।।२२८।।

स्थिती भक्तियोगाची । आहे एवढी थोरवीची । मनी, शिरी धरण्याची । योग्यता भक्ताची ।।२२९।।

आचरती भक्त जे येथे, सांगितले अमृतासम ।
मत्परायण, श्रद्धेने, मज अत्यंत ते प्रिय ।।भावगीता १२.२०।।

रम्य परी धर्मानुकूल । अमृतधारा वाटेल । जे जे अनुभवतील । ऐकोनि त्यांना ।।२३०।।

आचरतील जे श्रद्धेने । तसे चित्ती स्थैर्याने । वाढेल विस्ताराने । त्यांच्या ठिकाणी ।।२३१।।

अशी मनःस्थिती असेल । तेथे हे निरूपण होईल । तरी पेरणीप्रमाणे घडेल । उत्तम शेतात ।।२३२।।

परि मातें परम करूनि । इये अर्थीं प्रेम धरूनि । हेंचि सर्वस्व मानूनि । घेती जे पैं ।।२३३।।

पार्था गा जगीं । तेचि भक्त तेचि योगी । उत्कंठा तयालागीं । अखंड मज ।।२३४।।

ते तीर्थ ते क्षेत्र । जगीं तेचि पवित्र । भक्तिकथेसी मैत्र । जयां पुरुषां ।।२३५।।

आम्ही तयाचें करूं ध्यान । तो आमुचें देवतार्चन । तेवांचूनि आन । गोमटें नाहीं ।।२३६।।

तयाचें आम्हां व्यसन । तो आमुचें निधिनिधान । किंबहुना समाधान । तो मिळे तैं ।।२३७।।

पै प्रेमळाचि वार्ता । जे अनुवादती पांडुसुता । ते मानूं परमदेवता । आपुली आम्ही ।।२३८।।

ऐसें निजजनानंदें । तेणें जगदादिकंदें । बोलिलें मुकुंदें । संजयो म्हणे ।।२३९।।

राया जो निर्मळु । निष्कल लोककृपाळु । शरणागतां प्रतिपाळु । शरण्यु जो ।।२४०।।

जो धर्मकीर्तिधवळु । अगाधदातृत्वें सरळु । अतुलबळें प्रबळु । बळिबंधनु ।।२४१।।

जो पैं सुरसहायशीळु । लोकलालनलीळु । प्रणतप्रतिपाळु । हा खेळु जयाचा ।।२४२।।

जो भक्तजनवत्सलु । प्रेमजन प्रांजलु । सत्यसेतु सरळु । कलानिधि ।।२४३।।

मी परमप्राप्तव्य धरूनी । तसे प्रेम बाळगुनी । भक्ती सर्वस्व मानुनी । जगतात जे ।।२३३।।

पार्था या जगात । तेच खरे भक्त, योगी होत । त्यांची उत्कंठा लागत । अखंड मला ।।२३४।।

ज्यांना आवड भक्तीची । तीर्थ, क्षेत्र, पवित्र तेची । अशी धारणा ज्यांची । जगी असे ।।२३५।।

आम्ही त्यांचे करितो ध्यान । त्यांचे करितो पूजन । चांगले त्यांच्यावाचून । आम्हा न दुसरे ।।२३६।।

छंद त्यांचा आम्हाला । ठेवा वाटे जिवाला । भेटता ते आम्हाला । समाधान होते ।।२३७।।

कथा अशा प्रेमळांची । गाती आमुच्या भक्तांची । तेही परमदेवता आमुची । मानितो आम्ही ।।२३८।।

असा आनंद भक्तांचा । मूळ कारण जगाचा । श्रीकृष्ण बोलिला वाचा । संजय म्हणे ।।२३९।।

धृतराष्ट्रा,जो श्रीकृष्ण निर्मळ। पूर्ण लोककृपाळ। करी शरणागतांचा प्रतिपाळ। शरण जाण्या योग्य जो।।२४०।।

जो धर्मरक्षक उज्ज्वल । अपार औदार्ये सरळ । पराक्रमात अतुलबळ । बळिबंधनी राही ।।२४१।।

देवांना मदत करी । लोकसांभाळ लीला करी । प्रतिकार न करण्याचा खेळ करी । शरणागताचा ।।२४२।।

जो भक्तजनवत्सल । प्रेमळांशी प्रांजळ । सत्याचा सेतु सरळ । कलानिधी असे ।।२४३।।

तो कृष्णजी वैकुंठींचा । चक्रवर्ती निजांचा । सांगतुसे येरु दैवाचा । आइकतु असे ।।२४४।।

आतां ययावरी । निरुपिती परि । संजयो म्हणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ।।२४५।।

तेचि रसाळ कथा । मऱ्हाठिया प्रतिपथा । आणिजेल आतां । अवधारिजो ।।२४६।।

ज्ञानदेव म्हणे तुम्ही । संत वोळगावेति आम्ही । हें पढविलों जी स्वामी । निवृत्तिदेवीं ।।२४७।।

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु

ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ।।

ॐ श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ।

तो कृष्ण बोले वैकुंठीचा । राजा निजभक्तांचा । अर्जुन केवढा भाग्याचा । ऐकत असे ।।२४४।।

यानंतर आता । कृष्ण काय निरूपिता । झाला ते ऐका आता । संजय म्हणे धृतराष्ट्रा ।।२४५।।

ती रसाळ कथा । मराठी भाषेत आता । येईल पहा जाणता । आपण ऐका ।।२४६।।

ज्ञानदेव म्हणे तुम्हा संतांची। अशी सेवा करण्याची । शिकवण असे आम्हाला गुरुंची। श्री निवृत्तिदेवांची ।।२४७।।

गीतोपनिषदातील, बारावा भक्तियोग हा ।
अध्याय संपला येथे, भावे कृष्णास अर्पिला ।।
ॐ श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ।

अध्यायाची भावार्थ समओवी संपली । दीना प्रेरणा श्री ज्ञानेश्वर माउली ।
तिच्या चरणकमली अर्पिली । कृतज्ञ भावाने ।। श्रीराम ।।

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. अध्याय नववा : समओवी

२. हरिपाठपराग

३. दर्शन

४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट

५. साधनपदावली

६. जपसंकल्प

७. अभंगसाधना

८. जाग

९. जीवनजिज्ञासा

१०. विचारविश्वाची ओळख

११. चैतन्यचिंतन

१२. किमया

१३. प्रसादकण

१४. ठेवा

१५. संतबोध : भाग १

१६. संतबोध : भाग २

१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश

१९. नाम

२०. श्री विष्णुसहस्रनाम

२१. चिंतनक्षण ू (एकत्रित आवृत्ती)

२२. उपासनेची नोंदवही

२३. उत्तरायण - भाग १

२४. शोध

२५. दिशा

२६. उत्तरायण - भाग २

२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी

२८. बासरी

२९. उपासना

३०. अध्याय बारावा : समओवी

३१. कृपापदावली भाग : १

३२. कृपापदावली भाग : २

३३. साधनपदावली भाग १

३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा

३६. मेरी यात्रा (हिंदी)

३७. बोधपाठ

३८. एकाध्यायी विचारगीता

३९. सृष्टिसंदेश

४०. गुरुतत्त्वतरंगिणी

४१.समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)

५५. शिदोरी

५६. विचारविसावा

५७. सारविस्तार भाग २

५८. महाराजांची शाळा

५९. साधनपदावली भाग २

६०. आरतीपुष्पमाला

६१. विनवणीची वाणी

६२. श्रद्धेची पहाट

६३. उपासनामाला

६४. पावनपथ

६५. अनुभवपुष्पे - भाग १

६६. कृतज्ञतामार्ग

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

६९. संतबोध : भाग ४

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार

७१. उत्तरायण -भाग ३

७२. अनुभवपुष्पे - भाग २

७३. श्रद्धा

७४. अनुभवपुष्पे - भाग ३

७५. अर्घ्य

७६. जीवनचिंतन

७७. स्वास्थ्यसंवाद

७८. वचनांजली भाग १

७९. अक्षरायण

८०. वचनांजली भाग २

८१. भावगीता

***

साहित्य सोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया आक्षोणी ।
विवेकवेलीची लावणी । हों देई सैंघ ।।

खाणी मराठीच्या भूमीत । साहित्यसोन्याच्या उघडोत ।
विवेकवेलीची लावणी घडोत । सगळीकडे ।।

पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वादअव्हांटे ।
कुतर्काचीं दुष्टें । सावजें फेडीं ।।

नको दरी नास्तिकतेची । आडवाट वितंडवादाची ।
दुष्ट जनावरे कुतर्काची । हाकलून द्यावी ।।

पैं जे वानी श्यातुका । तेचि वेगळिया वाला येका ।
म्हणोनि एकदेशीया व्यापका । सरिसा पाडू ।।

सोन्याच्या मोठ्या लगडीला कस । तोचि त्याच्या गुंजभरास ।
योग्यता जी व्यापकास । थोड्यासही तीच ।।